# आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,
## राष्ट्रीय आरोग्य अभियान

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

NHM राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

| | |
|---|---|
| दुरध्वनी – ०२२ – २२७१७५०० <br> फॅक्स – ०२२ – २२६४२९५५ <br> E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com | आरोग्य भवन, ३रा मजला, <br> सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, पी - डिमेलो रोड, <br> सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४००००१ |


जा.क्र. /आरोग्यवर्धिनी केंद्र /युनानी प्रशि. /     / २०२०
दि. ०४/०८/ २०२०    29666-699

प्रति,
मा. प्रधान सचिव,
सार्वजनिक आरोग्य विभाग,
मंत्रालय, मुंबई

**विषय :- आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये नियुक्त होणा-या युनानी पदवीधारकांसाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक अंतर्गत प्रशिक्षण अभ्यासक्रमाचा (आधूनिक मध्यम स्तरीय सेवा प्रदाता अभ्यासक्रम ) कालावधी कमी करणेबाबत.**

संदर्भः - १) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र. जा.क्र.मआविवि/ई-३/११२६/२०२० दि. २९/०६/२०२०
२) मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, रा.आ.अ. मुंबई यांची मान्य टिपणी दि. २५/०७/ २०२०.

आरोग्यवर्धिनी केंद्रांमध्ये नियुक्त होणा-या युनानी आणि बी.एस्सी (नर्सिंग ) पदवीधारकांसाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक अंतर्गत प्रशिक्षण अभ्यासक्रमास मान्यता देण्याबाबत शासन निर्णय वैदयकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्र.एमईडी १०१८/प्र.क्र.२७०/१८ शिक्षण -२ दि.०२ ऑगस्ट २०१९ निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयामध्ये केंद्र शासनाच्या आयुष्मान भारत योजनेच्या Operational Guidelines No.४.१ नूसार बी.एस्सी (नर्सिंग) पदवीधारकांसाठी सहा महिने तसेच केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचे दि.२१/०१/२०१८ रोजीच्या पत्रातील सूचनेनूसार युनानी पदवीधारकांसाठी आठ महिने प्रशिक्षण कालावधी राहील असे नमूद आहे.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे तर्फे वर्षातून दोन वेळा Exit Exam चे आयोजन केले जाते. युनानी समुदाय आरोग्य अधिकारी यांचा प्रशिक्षण कालावधी ८ महिन्यांचा असल्याने सदर उमेदवार आयुर्वेदिक व नर्सिंग उमेदवारांसोबत Exit Exam साठी पात्र होत नाहीत. त्यामुळे युनानी पदवीधर समुदाय आरोग्य अधिकारी यांना पुढील सेमिस्टर मधील परीक्षा द्यावी लागते. युनानी समुदाय आरोग्य अधिकारी यांचा ७८३ तासांचा केंद्र शासनाने निर्देशित केलेला अभ्यासक्रम दररोज काही अतिरिक्त तास प्रशिक्षण कालावधी वाढवून सहा महिन्यात अभ्यासक्रम पूर्ण करता येऊ शकतो . त्या अनुषंगाने युनानी समुदाय आरोग्य अधिकारी यांचेसाठी सुधारित ६ महिन्यांचा अभ्यासक्रम विभागामार्फत तयार करण्यात आला व तो महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ , नाशिक यांना सादर करण्यात आला आहे.

उपरोक्त विषयांन्वये मा. कुलगुरु महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांना युनानी पदवीधर समुदाय आरोग्य अधिकारी यांचे प्रशिक्षणाचा कालावधी सहा महिन्याचा करणेबाबत विनंती करण्यात आली

Scanned with CamScanner

होती. यासंदर्भात महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे संदर्भिय पत्र दि.२९/०६/२०२० रोजी या कार्यालयास प्राप्त झालेले आहे. सदर पत्रात विद्यापीठाने शासन निर्णय, वैदयकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग महाराष्ट्र शासन दि.०२/०८/२०१९ चा दाखला देवून युनानी पदवीधारकांचा प्रशिक्षण कालावधी आठ महिन्यांचा राहील असे निर्देशित केलेले असल्यामुळे सदर कालावधी कमी करण्याची बाब विदयापीठाच्या अखत्यारीत येत नसल्याचे नमूद केले आहे.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी यासंदर्भात शासन निर्णयात त्याअनुषंगाने बदल होणे आवश्यक असून त्यानूसार शासनाकडे पाठपूरावा करुन शासन निर्णयातील बदलासह प्रस्ताव सादर करावा असे सूचित केले आहे. आपणास विनंती करण्यात येते की युनानी पदवीधर यांचा प्रशिक्षण कालावधी सहा महिन्याचा करण्यासंदर्भात व त्यानूसार शासन निर्णयामध्ये आवश्यक बदल करणेसाठी उचित कार्यवाही करण्यात यावी.

**(डॉ. विजय कंदेवाड)**
**सह संचालक (तांत्रिक),**
**रा.आ.अ. , मुंबई**

**प्रत माहितीस्तव –**

१) मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, रा.आ.अ. मुंबई
२) मा. अति. अभियान संचालक, रा.ना.आ.अ. मुंबई
३) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक



Scanned with CamScanner